## पान १ वरुन...

### मा.मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. जी.एस. कुलकर्णी यांच्या बेकायदेशीरपणाचे स्टिंग ऑपरेशन; सिडीसह तक्रार दाखल

त्या जागेवर १९७० पासून ताबा होता. परंतु सन २०१३ मध्ये त्याच्या जागेवर महादेव कोळी व इतर यांनी जबरदस्तीने ताबा केला असून त्याला त्याचा ताबा परत मिळवून देण्यात यावा.

आरोपीचा खोटेपणा हा जिल्हा व सत्र न्यायाधीश मुंबई यांनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३४० अंतर्गत केलेल्या चौकशीत उघड झाला आहे. त्या चौकशीच्या आधारे न्यायालयाच्या अधीक्षक श्रीमती लुमन सावंत यांनी फिर्यादी बनून महानगरदंडाधिकारी न्यायालयात तक्रार दाखल केली व आरोपी संजय पटेल आणि खंडेलवाल इंजिनीअरिंगचे इतर संचालक यांना न्यायालयातून जामीन घ्यावा लागला.

खोटेपणा उघडकीस आल्यानंतर आरोपी हे उच्च न्यायालयात दाखल दिवाणी दाव्याच्या सुनावणीत टाळाटाळ करू लागले म्हणून महादेव कोळी यांच्याकडून जागा घेणारे सध्याचे जागामालक सुरेंद्र मिश्रा, वासुदेव पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून त्यांचे प्रकरणाची त्वरित सुनवाईसाठी तारीख उच्च न्यायालयाने निश्चित करण्याची मागणी केली. यावर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना तसा अर्ज करण्याची परवानगी दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश जी.एस. कुलकर्णी यांनी केस Notice of Motion No. 44 of 2019 ची सुनावणी सुरु केली. ती सुनावणी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३४० नुसार असल्यामुळे आरोपीला त्या प्रकरणात हस्तक्षेप किंवा युक्तिवाद करण्याचा अधिकार नव्हता. परंतु तरी सुद्धा आरोपीचे वकिल एस. यु. कामदार यांनी प्रकरणात हस्तक्षेप केल्यामुळे त्यांना फिर्यादी व जागा मालक यांचे वकिल ॲड. निलेश ओझा यांनी नोटीस देवून प्रकरणात हस्तक्षेप न करण्याची ताकीद दिली. परंतु ॲड. कामदार यांनी आरोपीला गैरफायदा पोहोचविण्यासाठी पुन्हा प्रकरणात हस्तक्षेप करून न्यायालयात खोटे व दिशाभूल करणारे विधान केल्यामुळे ॲड. एस. यु. कामदार, एमडीपी पार्टनर्स यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यासाठी फिर्यादीतर्फे I.A. No. 01 of 2020 हा अर्ज दाखल करण्यात आला. त्या प्रकरणाची सुनावणी दि. २८.०१.२०२० रोजी न्या. जी. एस. कुलकर्णी यांच्या न्यायायालयात झाली. त्यावेळी फिर्यादीतर्फे ॲड. निलेश ओझा, ॲड. तन्वीर निझाम व ॲड. पार्थो सरकार यांनी युक्तिवाद केला. आरोपी वकिल एस. यु. कामदार यांनी स्वतःच वकिल व आरोपी या दोन्ही भूमिकेत युक्तिवाद केला. कायद्यानुसार आरोपी वकिलाने, बँड व गाउन काढून सामान्य आरोपीप्रमाणे युक्तिवाद करण्याची तरतूद बार कौन्सिल नियमात असून तसा स्पष्ट कायदा सुप्रिम कोर्टाने ठरवून दिला आहे. तसेच या कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी ॲड. एन. बी. देशमुख यांना मुंबई उच्च न्यायालयाने ४ महिन्यांची शिक्षा ठोठावली होती. परंतु न्या. कुलकर्णी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध जावून आरोपी वकिल एस. यु. कामदार यांना वकिलाच्या गणवेशात युक्तिवाद करण्याची परवानगी दिली. तसेच आरोपीला गैरफायदा पोहोचविण्याच्या उद्देशाने न्यायालयातील रेकॉर्डच्या बाहेर जावून खोटे व चुकीचे अभिप्राय आदेशात नोंदवून कामदार यांना वाचविण्याचा प्रयत्न केल्याचे मोबाईलमध्ये केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये सिद्ध झाल्याने न्या. जी. एस. कुलकर्णी विरुद्ध भादंवि १६७, २१८, २१९,१९२, १९३, ४६५, ४६६, ४६९, ४७१, ४७४, १२० (ब) अंतर्गत फौजदारी कारवाई करण्याकरिता रीतसर तक्रार मा. चीफ जस्टीस ऑफ इंडिया श्री शरद बोबडे व मा. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याकडे दाखल करण्यात आली आहे असे तक्रारकर्त्याने सांगितले.

याआधी सर्वोच्च न्यायालयाने अश्याच एका प्रकरणात न्या. सी. एस. कर्णन यांना ६ महिने तुरुंगात पाठविले होते. (2017) 7 SCC 1 न्या. निर्मल यादव यांच्याविरुद्ध सीबीआयने आरोपपत्र दाखल केले होते. 2011 SCC OnLine P 7 H 15415 न्या. शर्मात मुखर्जी यांना सीबीआयने अटक केली होती. 2003 SCC OnLine Del 821 जगत पटेल 2016 SCC OnLine Guj 4517 प्रकरणात स्टिंग ऑपरेशनमुळे दोन न्यायाधीशांना अटक झाली होती. तशीच कारवाई न्या. जी. एस. कुलकर्णी यांच्याविरुद्ध आवश्यक असल्याचे तक्रारकर्त्याने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. तसेच चौकशीच्या काळात न्या. कुलकर्णी यांची सर्व कामे ही इन - हाऊस प्रोसिजरच्या पॅरा ७ (ii) नुसार त्वरित काढून घेण्यात यावीत अशी मागणीही यावेळी करण्यात आली आहे.

## पान ८ वरुन...

### शेतकऱ्यांची फसवणूक आणि महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या निषेधार्थ मंगळवारला भाजपाचे धरणे आंदोलन

सरकारची कर्जमाफी योजनाही शेतकऱ्यांची सरसकट फसवणूक करणारी आहे. महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांची फक्त अल्प मुदतीची पीक कर्ज माफ करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा मिळणार नाही. दोन लाखांवर कर्ज असलेल्या तसेच कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांबाबत महाविकास आघाडीच्या कर्जमाफी योजनेत कसलाच उल्लेख नाही.

भाजपा सरकारच्या कर्जमाफीत पीक कर्ज तसेच मध्यम मुदतीचे कर्ज समाविष्ट केल्याने पॉलीहाऊस, शेडनेट, शेती उपकरणं, पशुपालन, शेळीपालन, मधमाशीपालन अशा सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला होता. भाजपा सरकारच्या व्यापक कर्जमाफीमुळे ४३ लाख खातेधारकांना १९ हजार कोटींचा लाभ देण्यात आला होता. तूर खरेदीचे निकष महाविकास आघाडी सरकारने बदलल्यामुळे शेतकऱ्यांकडून होणाऱ्या खरेदीचे प्रमाण खूप कमी झाले आहे. शेतकऱ्यांची घोर फसवणूक करणाऱ्या महाविकास आघाडी सरकारचा भाजपा तीव्र निषेध करीत आहे असे डॉ. शिरीष गोडे म्हणाले.

त्यांनी सांगितले की, गेल्या महिन्याभरात राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या घटनामध्ये मोठी वाढ झाली आहे. महिलांवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना धाक बसविण्याऐवजी महाआघाडी सरकारचे मंत्री गावोगावी सत्कार घेण्यात मश्गुल आहेत. हे सरकार सत्तेवर आल्यानंतर गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरलेला नाही. हिंगणघाट येथील प्राध्यापिकेला जिवंत जाळण्याच्या घटनेने संपूर्ण देश हादरुन गेला आहे. ॲसिड हल्ला, अल्पवयीन मुलींवर अत्याचार, बलात्कार, महिलांना जाळून टाकणे अशा घटना वाढू लागल्यामुळे महिला व तरुण मुलींमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. महिलावरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यात अपयशी ठरलेल्या महाविकास आघाडी सरकारचा भाजपा तीव्र निषेध करीत आहे.

मंगळवारी होणाऱ्या धरणे आंदोलनात खा.रामदास तडस, डॉ.शिरीष गोडे, अतुल तराळे, अविनाश देव, पवन परीयाल, सुनील गफाट, प्रशांत इंगळे, अर्चना वानखेडे, प्रदिपसिंह ठाकुर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

# इमरान राही वर्धा जिल्ह्याचे साहित्य रत्न - आ.समीर कुणावार



आ. समिर कुणावार यांना पुस्तक भेट देतांना इमरान राही

### * कृष्णाई निवासात पुस्तक भेट समारंभ

**शहर प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**हिंगणघाट :** प्रख्यात शायर तथा जेष्ठ समाजसेवक इमरान राही वर्धा जिल्ह्याचे साहित्य रत्न आहे. सामाजिक सेवा आणि शायरीच्या माध्यमातून राही यांनी वर्धा जिल्ह्याला देशभरात मोठी ओळख मिळवून दिली आहे. असे गौरवोद्गार स्थानिक आ.समीर कुणावार यांनी व्यक्त केले.

ते कृष्णाई निवास येथे आयोजित इमरान राहीची पुस्तक भेट समारंभात अध्यक्ष म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, इमरान राही यांचे पहिले पुस्तक **'खयाल-ए-राही'**ची लोकप्रियता संपूर्ण भारत भर आहे.

पहिल्या पुस्तकाला मिळालेल्या अपार लोकप्रियतेनंतर आता त्यांचे दुसरे पुस्तक **'पयाम-ए-राही'** लवकरच प्रकाशित होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पार्टीचे वर्धा शहर अध्यक्ष पवन परीयाल म्हणाले की, इमरान राही मागील ३५ वर्षापासून साहित्य व समाजसेवेमध्ये लीन आहेत. जातीगत भेदभाव व धार्मिक उन्माद यांना दूरचा सलाम करत इमरान राही देशात समानता आणि विकासाचे समर्थक आहे.

यावेळी इमरान राही यांनी त्यांचे पुस्तक **'खयाल-ए-राही'** समीर कुणावार यांना भेट स्वरुपात दिले. यावेळी प्रख्यात शायर आरिफ काझी, ॲड.इब्राहीम बख्श आजाद, मुन्ना खान आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

# गिमाटेक्स इंडस्ट्रीजला आग; ५० लाखाचे नुकसान




**ता. प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**हिंगणघाट :** येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ वरील वणी येथील गिमाटेक्स इंडस्ट्रीज येथे आज पहाटे आग लागली असून या आगीत जवळपास ५० लाखाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. परंतु कोणतीही जीवितहानी झाली नाही. स्पिनिंग विभागाचे पॉलिस्टर युनिटमधे पहाटे ४ वाजता आग लागल्याची माहिती मिळताच येथील उपस्थित कर्मचाऱ्यांनी आगीची सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली.

या आगीमध्ये यूनिमिक्स मशीन, मिक्सिंग सार मशीन,इलेक्ट्रिकल बोर्ड व इतर साहित्य,विस्कोस मिक्स इत्यादि साहित्य जळून खाक झाले. प्राथमिक अंदाजा नुसार मशीन घर्षणाने किंवा शार्ट सर्किट मुळे आग लागल्याचा अंदाज असून याबाबत हिंगणघाट पोलिसांत तक्रार नोंद करण्यात आली आहे.

# एमआयएमचे माजी आ.वारीस पठाण यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

### * भारतीय जनता युवा मोर्चाचे वरुण पाठक यांची मागणी




**प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**वर्धा :** एमआयएमचे माजी आमदार वारीस पठाण यांनी केलेले वक्तव्य अत्यंत प्रक्षोभक असून या वक्तव्याने देशातील शांतता भंग होण्याचा धोका आहे.

तेव्हा त्यांच्याविरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन त्याला तातडीने अटक करण्यात यावी अशी आग्रही मागणी भाजयुमोचे जिल्हा प्रभारी वरुण पाठक यांनी शनिवारी वर्धा शहर पोलिसांकडे केली आहे. याबाबत लेखी तक्रार देखील दाखल केली आहे. दरम्यान या प्रकरणी कायदेशीर सल्ला होऊन पुढील कारवाई करण्यात येईल असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

वारीस पठाण यांच्या प्रक्षोभक भाषणाचा व्हीडीओ सर्वत्र व्हायरल झाला आहे. १५ कोटी मुस्लिम १०० कोटी हिंदूवर भारी पडतील अशी धमकी पठाण या व्हीडीओद्वारे देत आहे. या वक्त्यावरुन वरुण पाठक यांनी पोलिसांकडे एक पाणी तक्रार केली आहे. वारीस पठाण यांच्या भाषणाची क्लीप आपण टिव्हीवर पाहिली. हे संपूर्ण भाषण प्रक्षोभक आहे. या भाषणाने दोन धर्मात तेढ वाढून तणाव निर्माण होण्याचा धोका आहे. त्यामुळेच पठाण विरुद्ध तातडीने देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात यावी, अशी मागणी वरुण पाठक यांनी केली आहे.

यावेळी भाजपा विधी आघाडीने जिल्हाध्यक्ष ॲड.महेश धाये, भाजपाचे निलेश पोहकर, अनिल धोटे, भाजयुमो सरचिटणीस राहुल करंडे, दिनेश डकरे, प्रविण मोहाडकर, अमित द्विवेदी, मोहीत उमाटे, रजत शेंडे, चेतन गुजर, कुणाल दुरतकर, सागर वासकर, विकास काळे, अश्विन खंडारे, बादल झामरे, पवन धनविज, आकाश सुर्यवंशी, पवन सुर्यवंशी इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आकाशवाणी व दुरदर्शन कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी



**प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**वर्धा :** छत्रपती शिवाजी महाराजांची ३१० वी जयंती अप्पर महानिर्देशक (अभि.) आकाशवाणी व दुरदर्शन प्रतिष्ठा भवन, मुंबई येथील कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. राजेश जैन, अप्पर महानिर्देशकर (अभि.) यांनी दिपप्रज्वलन करुन शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. मनिष देसाई महानिर्देशक, प्रेस इन्फॉरमेशन ब्युरो सीपी (बी) मुंबई क्षेत्र विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. राजेश जैन यांनी यावेळी शिवाजी महाराजांच्या जिवन कार्याबद्दल विस्तृत विमोचन केले. शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या उभारणीवरुन ते उत्कृष्ट अभियंता होते. हे जैन यांनी यावेळी सांगितले. मनिष देसाई यांनी सुद्धा यावेळी शिवाजी महाराजांनी स्वराज्य कसे व का मिळवितो हे विषद केले. प्रमुख उपस्थितांमध्ये उपमहानिर्देशक सर्वश्री निवासवर्धन, जयप्रकाशबाबू, सुधीर सोधीया, रमेश घरडे, निर्देशक संजय बोडेले, महेंद्र निले, रविंद्र गायेल, सहा.निर्देशक जे.पी.गुप्ता, अनुराग विस्ता, सहा.अभियंता सर्वश्री हरीशचंद्र श्रीपत, कुमार लखाने, मारोती माने, रविंद्र महालपुरे इत्यादींचा समावेश होता. नंदकुमार वानखेडे, सहाय्यक अभियंता व उपाध्यक्ष (प.क्षेत्र) आकाशवाणी व दुरदर्शन कर्मचारी संघटना (एआरटीईई) यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन केले. सहा.अभियंता रत्ना भांबरे, उपनिर्देशक पी.आय.बी. तिडके यांची सुद्धा कार्यक्रमाला उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संदीप आचरेकर, मिलिंद जोशी, प्रशांत सावंत, प्रदीप परब, निलेश परब, बालकृष्ण सुर्वे, सुनिल तळेकर, हरचिरकर, अली, अंसारी, मोरे, महापती व अप्पर महानिर्देशक आकाशवाणी व दुरदर्शन आणि प्रेस इन्फॉरमेशन ब्युरो कार्यालयातील कर्मचारी सहभागी होते.

# आत्महत्याग्रस्त कुटुंबाला 'नाम' संस्थेकडून आर्थिक मदत

**ता. प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**पुसद :** 'नाम' फाऊंडेशन तर्फे मान्यवरांच्या हस्ते रविवारी तारीख २६ ला माळकीन्ही येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी यांच्या कुटुंबाला १५ हजार रुपयांचा धनादेश देऊन बळीराज्याला दिला जगण्याचा मोठा आधार....

महागाव तालुक्यातील माळकिन्ही येथील शेतकरी गजानन शिरडकर ह्या शेतकर्याने कर्जाला कंटाळून गळफास लावून जीवनयात्रा संपवली. सदर कुटुंबाकडे चार ऐकर जमीन आहे. कुटुंबातील कर्ता गेला, कुटुंब उघड्यावर आले. मुलगी लग्नाला आली,मुलांचे शिक्षण ही सारीच जबाबदारी विधवा पत्नीवर पडली आहे.चार एकर जमिनीवर कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवावा कसा व मुलीचं लग्न, शिक्षण ह्या समश्या भेडसावत आहेत.

सिनेअभिनेते नाना पाटेकर,मकरंद आनासपुरे यांनी नाम फाऊंडेशन संस्थेकडून शेतकरीआत्महत्याग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत करन्याचे काम करीत आहे.तेव्हा ह्या कुटुंबाची माहिती नामफॉडेशनचे स्वप्निल देशमुख यांना देण्यात आली असता त्यांनी सदर प्रकरन वरिष्ट यांच्या कडे पाठऊन नाम चे विदर्भ व खानदेश समन्वयक हरीश इथापे यांनी प्रस्ताव मंजूर केला व मृतकांची पत्नी रशीका शिरडकर हीला पंधरा हजारांचा धनादेश प्रजासत्ताकसत्ताक दीनी नाम चे विदर्भ व खानदेश प्रमुख हरीश इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली सुपूर्द केला.

माळकिन्ही ग्रामपंचायत कार्यालयात धनंजय देशमुख, माळकिन्हीच्या सरपंच श्रीमती जानकाबाई गोदमले, उत्तमराव चिंचोलकर उपसरपंच यांच्या हस्ते धनादेश देण्यात आला. या वेळी नाम चे स्वप्नील देशमुख, पवन देशमुख, तात्यासाहेब नाईक. तसेच माळकीन्ही येथील आनंदराव खंदारे, विश्वनाथ कलाने, भीमराव मते,गजानन गोदमले, आमृता ढोले,रमेश लहाने, नाम फाऊंडेशनचे पदाधिकारी व इतर गावकरी उपस्थितीत होते.

# माजी राज्यपाल पुत्रालाही प्रकल्पात रस

**प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**नागपुर :** नेर धामना प्रकल्पातील कंत्राटदार कंपनी माजी राज्यसभा खासदार अजय संचेती यांच्या कुटुंबातील आहे. त्यामुळे राजकीय पाश्वभूमी असलेल्या कुटुंबामुळे की काय, या प्रकरणात माजी राज्यपालांच्या मुलानेही रस घेतला होता आणि या प्रकल्पातील अधिकाऱ्यांची बदली रद्द करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पत्रही पाठवले होते.

नेर धामना प्रकल्पात केंद्रीय जल आयोगाच्या आराखड्याची (डिझाइन) प्रतीक्षा न करताच जलसंपदा विभागाने एसएमएस इन्फ्रास्ट्रक्चर आणि मेसर्स डी. ठक्कर कंपनीला कंत्राट दिले. पण या कारभारावर राज्यभरातून प्रश्न उपस्थित झाल्यानंतर अकोला येथील जलसंपदा विभागाच्या कार्यालयातील अधीक्षक अभियंता एस. डी. कुळकर्णी यांची बदली अन्यत्र करण्यात आली होती. पण ते नेर धामना प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत, त्यांची बदली दुसरीकडे झाल्यास प्रकल्पावर कसा परिणाम होऊ शकतो.

### सावरकर ते एनपीआर; भाजपा ठाकरे सरकारला पकडणार कोडींत

विरोधकांना चहापानाला बोलावण्यात येतं ते संवाद घडवून आणण्यासाठी पण सरकारमध्ये सुसंवाद होताना दिसत नाही, अशी टीका फडणवीस यांनी केली.

ही युती प्राकृतिक नाही. त्यांच्यामध्ये वैचारिक भिन्नता आहे. हे तिन्ही पक्ष फक्त सत्तेसाठी एकत्र आले आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शिवसेनेचा सीएए, एनपीआर ला पाठिंबा आहे, तर काँग्रेसचा त्याला पूर्ण विरोध आहे. राष्ट्रवादीची नेमकी भूमिका मात्र अद्याप समजू शकली नाही. यावरून या विषयावर तिन्ही पक्षांच्या तीन वेगळ्या भूमिका आहे ते स्पष्ट होतं, असं फडणवीस म्हणाले.

एनआयए कडे अर्बन माओवादाचा तपास देण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी स्वीकारली त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करणार आहे. त्यांनी स्वतः त्याबाबतचे पुरावे पाहिले असतील. त्याची व्याप्ती फक्त महाराष्ट्रापुरती नसून, इतर राज्यांमध्ये सुद्धा आहे. म्हणून याबाबत एपआयए तपासाची गरज आहे. सीएए, एनपीआर बाबत मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या भूमिकेचे आणि स्वागत करतो, असे फडणवीस म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी भीमा कोरेगाव दंगलींच्या दिवशी सकाळी पत्रकार परिषद घेऊन यामध्ये हिंदुत्ववाद्यांचा हात असल्याबाबत आरोप केले होते. आतापर्यंत करण्यात आलेल्या तपासामधून त्यांच्या या विधानाला छेद मिळत आहे. त्यामुळे ते अशी विधान करून बुद्धिभेद करून दलित समाजामध्ये कॉन्फ्युजन निर्माण करू पाहता आहेत, असं फडणवीस म्हणाले.

# शिवजयंती निमित्त वीर भगतसिंह संस्थेचा गरजु विद्यार्थ्यांना मदतीचा हात

### २५ विद्यार्थ्यांना वार्षिक, शैक्षणिक मदत

**ता.प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**सेलू :** येथील वीर भगतसिंह संस्थेच्या वतीने शिवजयंतीनिमित्त २५ गरजु विद्यार्थ्यांना वार्षिक शैक्षणिक मदत देण्यात आली. शिवजयंतीच्या पर्वावर गरजु विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत संस्थेच्या वतीने खऱ्या अर्थाने शिवरायांना वंदन करण्यात आले.

शिवजयंती निमित्त व्हीबीएस युनीटी जिममध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम




विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देतांना वीर भगतसिंह संस्थेचे पदाधिकारी

छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली. वीर भगतसिंह संस्था मागील वर्षीपासून शिवजयंतीनिमित्त 'पढेगा इंडिया, तभी तो आगे बढेगा इंडिया' या उपक्रमांतर्गत गरीब व गरजु मुलांच्या वार्षिक शिक्षणाचा भार उचलत आहे. यावर्षी देखील शिवजयंतीच्या पर्वावर वरील उपक्रमाअंतर्गत २५ गरजू विद्यार्थ्यांना वार्षिक शैक्षणिक मदत देण्यात आली. यावेळी वीर भगतसिंह संस्थेच्या सदस्यांसह शिवगर्जना मित्रमंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# वाघाने पाडला गोऱ्ह्याचा फडशा

**प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**केळझर :** खडकी (आमगांव)पासून अवघ्या दिडशे मिटर अंतरावर असलेल्या शेतातील गोठ्यात पट्टेदार वाघाने प्रवेश करून गोऱ्ह्याला ठार केले.

शनिवारी सकाळी ही घटना उघडकीस आली असून घटनेमुळे परीसरातील नागरीकांमध्ये वाघाबाबत कमालीची दहशत निर्माण झाली आहे.गोऱ्ह्याला ठार करणारा पट्टेदार वाघ नसून बिबट असल्याचे सांगण्यात येते. नुकसानग्रस्त पशुपालकास वनविभागाने शासकीय मदत देण्याची मागणी होत आहे.

# बैलचोरी

**प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**कारंजा (घा) :** नजीकच्या हेटीकुंडी जामणी येथील दिपक ठाकरे यांच्या मालकीचा बैल चोरट्यांनी चोरून नेला.

या प्रकरणी तक्रारीवरून शेख शोएब शेख सलाम कुरेशी, शहबाज अहमद शेख सत्तार कुरेशी, रियाज अहमद शेख, शेख शाबीर शेख कदीर,हेमंत बिजावार यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सोलार कंपनीत व्यक्तीचा मृत्यू

### कंपनीतच छातीत झाल्या असह्य वेदना

**प्रतिनिधी / २३ फेब्रुवारी**

**कारंजा (घा) :** सोलार कंपनीमध्ये कार्यरत हेटीकुंडी येथील व्यक्तीचा मृत्यु झाला. गोपाल श्रिराम क्षीरसागर (४७)रा.हेटीकुंडी असे मृताचे नाव आहे. गोपाल क्षीरसागर (४७)हे बाजारवाडा येथील सोलार कंपनीत प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून नऊ वर्षापासून कार्यरत होते.

नेहमीप्रमाणे ते कंपनीत कर्तव्यावर गेले. त्यानंतर रात्रपाळीच्या दुसऱ्या सत्रात काम करतांना अचानक छातीत तिव्र वेदना सुरू झाल्या आणि जमिनीवर कोसळले. त्यांना प्रथमोपचारासाठी नागपूर येथे दाखल करण्यात आले.

दरम्यान त्यांना मृत घोषीत करण्यात आले.मृतदेह घरी आणल्यानंतर कंपनीविषयी संतापजनक वातावरण गावात निर्माण झाले होते. दरम्यान कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक एम.के.सिंग, अनिरूद्ध पांडे यांच्यासह कंपनीची चमू गावात पोहोचली. त्यांनी कुटूंबाला आर्थीक मदत देण्याचे आश्वासन दिले.